**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** उमरेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0380 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/05/2025 06:26

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 13/05/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/05/2025

**Time From (वेळेपासून):** 12:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/05/2025 **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/05/2025 06:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गॅलेक्सी बार रेस्टॉरेन्ट, उमरेड,उमरेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस स्टेशन उमरेड
नागपूर (ग्रा.)



6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विजय गोपिचंद चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट क्र 49,ड्रीम सिटी मोहपा रोड,उमरेड,उमरेड,उमरेड,नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट क्र 49,ड्रीम सिटी मोहपा रोड,उमरेड,उमरेड,उमरेड,नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रविण किशन कांबडे | | | 1. निर्मल हिंदोरीया याचे घरी , दुर्गापूर शाळेजवळ,कावरापेठ, उमरेड,उमरेड,नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजेश गोपिचंद गंथाळे | | | 1. बजेरीया मराठी तेलीपुरा, राजवाडा पॅलेस जवळ,नागपूर, नागपूर,गणेशपेठ,नागपुर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | वाहने आणि इतर | मोपेड/पॅडलयुक्त मोटर साइकल | अॅक्टीवा मो सा क्र एम एच 49 बी एफ 3302 | 30,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम नगदी | 10,000.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | तक्रारदार विजय चव्हान यांचे वैध्यकिय पति पुर्तीचा प्रस्थावाचा मुळ नस्तीच्या छायाकीत प्रति | 0.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | वैशाली प्रभाकर राहाटे यांचे पतिचे वैध्यकिय प्रतिपुर्तीच्या प्रस्थावाचा मुळ नस्ती 2 फॉईल | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

कॅम्प-अँन्टी करप्शन ब्युरो, जुने सचिवालय कार्यालय, नागपूर दिनांक – 15/05/2025फिर्याद मी श्री. विजय गोपीचंद चव्हान, वय 42 वर्ष, व्यवसायः- नौकरी, सहायक शिक्षक, अशोक कन्या विद्यालय,उमरेड, रा. प्लॉट नं. 49, ड्रीम सिटी , मोहपा रोड उमरेड जि.नागपूर  मी दिनांक 13/05/2025 रोजी श्री.प्रशांत केदार, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, जुने सचिवालय, नागपूर यांचे समक्ष हजर येवून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री.प्रशांत केदार, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.    कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, जुने सचिवालय,नागपूर दिनांक - 13/05/2025वेळ:-  12.50  वा. तक्रार प्रति, मा. पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो, नागपूर. विषय:- लाच मागणीची तक्रार असल्याबाबत.नांवः-   श्री. विजय गोपीचंद चव्हान, वय 42 वर्ष, व्यवसायः- नोकरी, सहायक शिक्षक, अशोक कन्या विद्यालय,उमरेड, रा. प्लॉट नं. 49, ड्रीम सिटी , मोहपा रोड उमरेड जि.नागपूर मो.क्र. 9923182783मी समक्ष अँन्टी करप्षन ब्युरो, नागपूर कार्यालयात हजर येवुन तक्रार देतो की, मी वर नमुद पत्त्यावर परिवारासह राहत असुन अशोक कन्या विद्यालय,उमरेड जि. नागपूर या अनुदानित शाळेत  सहायक शिक्षक पदावर सन 2007 पासून नोकरीला आहे. दिनांक 02/04/2024 रोजी अचानक माझी प्रकृती खराब झाल्याने मला माझे पत्नीने तात्काळ उमरेड जि. नागपूर येथील डॉ. सोळंकी यांच्या कडे प्राथमिक उपचाराकरीता घेवून गेले. डॉ. सोळंकी यांनी माझेवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचाराकरीता नागपूर येथे नेण्याचा सल्ला दिला. त्यामुळे माझे पत्नीने मला इशा हॉस्पीटल,नागपूर येथे उपचाराकरीता भरती केले. इशा हॉस्पीटल , नागपूर येथील डॉ. प्रषांत फुलझेले यांनी मला तीव्र पोटाचा आजार झाल्याचे निदान करून माझेवर दिनांक 02/04/2024 ते दिनांक 18/04/2024 पावेतो उपचार केला. त्याबाबतचा संपुर्ण दवाखाण्यातील उपचाराचा खर्च एकूण 1,88,612 /- रू. मी स्वतः दिलेला आहे. त्यामुळे उपचाराकरीता केलेल्या खर्चाचा बिल एकूण रू. 1,88,612 /- शासकिय नियमानुसार परत मिळणेकरीता खर्चाचे बिल तयार करून त्याबाबतचा प्रस्ताव मी दिनांक 02/12/2024 रोजी मा. मुख्याध्यापक, अशोक कन्या विद्यालय, उमरेड जि. नागपूर यांच्या मार्फतीने मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे

पोलीस स्टेशन उमरेड
ग्रा. नागपूर (ग्रा.)



कार्यालयात सादर केलेला होता. सदर प्रस्तावात मा. सि.एस., मेयो हॉस्पीटल, नागपूर यांचे पत्र जोडले नसल्याने त्याची त्रूटी पुर्तता करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्याबाबत मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक 17/02/2025 रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव मुख्याध्यापक, अशोक कन्या विद्यालय, उमरेड जि. नागपूर यांचेकडे परत केलेला आहे. सदर प्रस्ताव मुख्याध्यापक,अशोक कन्या विद्यालय, उमरेड जि. नागपूर यांना दिनांक 28/02/2025 रोजी परत मिळाल्याचे मला कनिष्ठ लिपीक श्री. प्रविण कांबळे यांचे कडून समजले होते. त्यावेळी त्यांनी मला मेडीकल बिल प्रस्तावातील त्रूटी पुर्तता करून मा.सि.एस.,मेयो हॉस्पीटल नागपूर यांना पाठवितो म्हणून बोलले होते. मी दिनांक 16/04/2025 रोजी नेहमीप्रमाणे शाळेत गेलो व कनिष्ठ लिपीक श्री. प्रविण कांबळे यांना भेटून बिलातील त्रूटी पुर्तता करून प्रस्ताव मा.सि.एस.,मेयो हॉस्पीटल नागपूर यांचेकडे लवकरात लवकर पाठविणेबाबत बोललो असता,त्यांनी प्रस्ताव पाठवितो असे मला सांगीतले परंतु दिनांक 09/05/2025 रोजी पावेतो प्रस्ताव पाठविला नाही म्हणुन मी त्याच दिवशी वेळ अंदाजे 12.00 वा. च्या दरम्यान श्री. प्रविण कांबळे यांना षाळेतच भेटून मेडीकल बिलाचे प्रस्ताव मा. सि.एस.,मेयो हॉस्पीटल नागपूर यांचेकडे पाठविण्याकरीता बोललो असता तेव्हा श्री. प्रविण कांबळे यांनी मला शाळेच्या वरांडयात घेवुन गेले व '' मेडीकल बिलचा प्रस्ताव मा.सि.एस., मेयो हॉस्पीटल नागपूर यांचेकडे पाठविण्याकरीता रू. 10,000/- दया, तरच पुढे सादर करतो कारण की, मेयो हॉस्पीटल मधील बाबु श्री. राजेश गंथाडे यांना पैसे दिल्याषिवाय तेथील बाबु राजेश गंथाडे हे कोणतीही फाईल मा. सि.एस.मेयो हॉस्पीटल यांचेकडे मंजुरीकरीता ठेवत नाही म्हणून तुम्ही पैसे दया, मी मुख्याध्यापक मॅडमची पत्रावर स्वाक्षरी घेवून तुमची फाईल मेयो हॉस्पीटल येथे पाठवुन देतो'' असे मला बोलले. दिनांक 12/05/2025 रोजी अंदाजे वेळ 11/00 वा चे दरम्यान श्री. प्रविण कांबळे हे मला अचानक कळमना चैक, उमरेड येथे भेटले व तुझे काम करायचे आहे किंवा कसे? असे विचारले व तु उदया सोबत सांगीतलेले 10,000/- रू. घेवून ये, आपण उदया सायंकाळी 7.30 ते 8.00 वा. च्या दरम्यान लज्जत हॉटेल, उमरेड येथे भेटु व सविस्तर बोलु, येण्यापुर्वी मला फोन कर'' असे बोलले. परंतु मला अशोक कन्या विद्यालय, उमरेड जि.नागपूर येथील कनिष्ठ लिपीक श्री. प्रविण किसन कांबळे व मेयो हॉस्पीटल येथील बाबु श्री.राजेश गंथाडे यांना माझे स्वतःचे मेडीकल बिल मंजुरीकरीता कोणतीही लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नाही. त्यामुळे मी अँन्टी करप्शन ब्युरो,नागपूर येथे कनिष्ठ लिपीक श्री. प्रविण किसन कांबळे व मेयो हॉस्पीटल येथील बाबु श्री.राजेश गंथाडे यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार देत आहे. कनिष्ठ लिपीक श्री. प्रविण किसन कांबळे व मेयो हॉस्पीटल येथील बाबु श्री.राजेश गंथाडे यांच्याशी माझे कोणतेही भांडण अथवा वैर नाही तसेच आमच्यात कसलाही पैसे देवाणघेवाणीचा आर्थीक व्यवहार यापुर्वी झालेला नाही.करीता अशोक कन्या विद्यालय, उमरेड जि. नागपूर येथील कनिष्ठ लिपीक श्री. प्रविण किसन कांबळे व मा. सि.एस. कार्यालय मेयो हॉस्पीटल, नागपूर येथील बाबु श्री.राजेश गंथाडे यांचेविरूध्द योग्य कायदेषीर कारवाई होण्याकरीता मी तक्रार देत आहे तसेच लाचेची पडताळणी करीता माझ्याकडील बचतीतील 10,000/- रूपये एवढी रक्कम आपणाकडे जमा करीत आहे. त्याप्रमाणे माझे मेडीकल बिल संबधाचे कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती आपल्याकडे सादर करीत आहे. हिच माझी तक्रार आहे. माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीत कार्यालयीन संगणकावर टंकलिखीत करून सदर तक्रारीची प्रिन्ट काढून मला वाचण्यास दिली,मी सांगीतल्याप्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असून बरोबर आहे. माझी वरील नमुद तक्रार नोंदवुन घेतल्यानंतर हस्तलिखीत व टंकलिखीत तक्रारीवर मी स्वतः स्वाक्षरी केली त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. केदार साहेबांनी सुध्दा दोन्ही तक्रारीवर स्वाक्षरी केली. सदर पुढील कार्यवाही कामी दोन शासकीय पंचांना पाचरण केले. दोन शासकीय पंच अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर आल्याने केदार साहेबांनी मला पंचांची ओळख करून दिली तसेच माझी त्यांना ओळख करून दिली. श्री. केदार साहेबांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार पंचांना वाचण्यास दिले. त्यानंतर श्री. केदार साहेबांच्या सुचनेवरून सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. यानंतर सर्व प्रथम गैरअर्जदार यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करणे आवश्यक असल्याने श्री. केदार साहेबांनी मला व पंचांना सापळा कार्यवाहीकामी वापरण्यात येणा-या अँथ्रासीन पावडरचा वापर व गुणधर्म समजावुन सांगितले. व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली व सापळा पडताळणी तसेच कार्यवाहीच्या वेळी व्हाईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याबाबत सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. केदार यांनी सापळा पडताळणी व कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यानंतर पॅन्टच्या खिश्यातून रूमाल बाहेर काढून चेहरा पुसण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहात पकडतील असे सांगीतले. यानंतर मी माझ्या टुव्हीलर अँक्टीव्हा गाडी क्रमांक एम एच 40 सी डब्लू 5094 ने व श्री. केदार साहेब व सापळा पार्टीतील सर्व सदस्य लाच मागणी पडताळणी करीता लागणारे साहित्यासह अँन्टी करप्शन कार्यालयातून त्यांचे सरकारी वाहनाने माझे पाठोपाठ लागलीच निघून उमरेड-भिवापुर रोड, वरील श्री. व्यंकटेश लॉन, उमरेड जवळील निर्जन

ठिकाणी पोहचलो. त्यानंतर श्री केदार साहेबांनी पंचासमक्ष गैरअर्जदार श्री. प्रविण कांबळे, कनिष्ठ लिपीक, अशोक कन्या विद्यालय उमरेड जि. नागपूर व मेयो हॉस्पीटल येथील बाबु श्री.राजेष गंथाडे यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन, पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. मी प्रविण कांबळे यांनी भेटायला येण्यापुर्वी फोन करण्यास सांगीतले होते, म्हणून श्री.केदार साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात सुरु करून श्री.प्रविण कांबळे यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9689926057 वर फोन करून स्पिकर मोडवर ठेवून, त्यांनी त्यांचा मोबाईल फोनवरील कॉल उचलल्यावरून भेटण्यास येत असल्याचे सांगीतले. तेव्हा श्री. प्रविण कांबळे यांनी मला 10-15 मिनीटात लज्जत हॉटेल , उमरेड येथे येण्याचे सांगून भेटण्यास बोलविले. त्यानंतर लगेच काही वेळानंतर श्री. प्रविण कांबळे यांनी मला यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9689926057 यावरून फोन करून कळमना चैक, नागपूर रोड, उमरेड येथे भेटण्यास बोलविले. म्हणून मला पोनि श्री. प्रशांत केदार यांनी पंच क्र. 1 यांच्यासह व्हाईस रेकॉर्डर त्यांच्या आवाजात सुरू करून मला माझे दुचाकी अँक्टीवा गाडी क्र एम एच 40 सी डब्लू 5094 ने गैरअर्जदार श्री. प्रविण कांबळे यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता कळमना चैक, नागपूर रोड, उमरेड येथे पाठविले. मी व पंच क्र. 1 यांचे सह गैरअर्जदार यांचेकडे माझे कामाबद्दल बोलणी करण्यास गेलो असता कळमना चैक, उमरेड येथे गैरअर्जदार श्री. प्रविण कांबळे हे मला भेटले व गॅलक्सी बार व रेस्टारेन्ट येथे आपण जावून कामाबाबत सविस्तर बोलू असे म्हटल्यावरून, मी माझे सोबत असलेले पंच क्र. 1 व गैरअर्जदार श्री. प्रविण कांबळे असे, गॅलक्सी बार व रेस्टारेन्ट, उमरेड येथे गेल्यानंतर, त्याठिकाणी असलेल्या टेबलवर बसून मी माझे मेडीकल बिलाचे प्रस्तावाबाबत बोलणी केली असता, श्री. प्रविण कांबळे यांनी मा.सि.एस.,मेयो हॉस्पीटल नागपूर येथे मेडीकल बिलाचा प्रस्ताव मंतुरी करीता पाठविण्याकरीता 10,000/- ची मागणी केली. तसेच मला सांगीतले की,'' मा. सि.एस., मेयो हॉस्पीटल, नागपूर येथील बाबु श्री. राजेष गंथाळे यांना पैसे दिल्याशिवाय तुमचा मेडीकल बिलाचा प्रस्ताव पास होणार नाही. म्हणून मी उद्या नागपूरला जाणार आहे, तर 10,000/- रू. व मेडीकल बिलाची फाईल मी त्यांना देतो व तुमचे काम करून देतो, असे बोलल्यावरून मी त्यांना आज माझे कडून आपण मागीतलेले दहा हजार रूपये शक्य होणार नाही, मला माझे पत्नी कडून रक्कम घ्यावी लागेल म्हणून मी उद्या दिनांक 14/05/2025 रोजी आपण सांगीतल्याप्रमाणे 10,000/- रू. आणून देतो असे मी बोलल्या वरून मी व पंच क्र. 1 आम्हांला दिलेल्या सुचणेप्रमाणे निघून सापळा पथक थांबुन असलेले ठिकाण श्री. व्यंकटेश लॉन, भिवापूर रोड उमरेड जि. नागपूर येथे परत येवून पंच क्र. 1 यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. तसेच श्री. प्रविण कांबळे यांचे भेटीदरम्यान घडलेली हकीकत श्री केदार साहेबांना सांगीतले. त्यानंतर मला गैअर्जदार श्री. प्रविण कांबळे यांनी मागीतलेली लाच रक्कम 10,000/- रू. दिनांक 14/05/2025 रोजी घेवून बोलविल्याने, आम्ही व सापळा पथकातील सर्व सदस्य यांनी सदर सापळा कार्यवाही दिनांक 14/05/2025 रोजी करावयाचे सर्वानुमते ठरविले. त्याप्रमाणे आज दिनांक 14/05/2025 रोजी मी नेहमी प्रमाणे माझे शालेय कामकाजाकरीता हजर असतांना, मला गैरअर्जदार श्री. प्रविण कांबळे यांनी प्रत्येक्ष भेट झाल्यावर, शालेय कामगाज संपल्यानंतर भेटण्यास सांगीतले. मी माझे शालेय कामकाज झाल्यानंतर श्री. केदार साहेब यांना फोन करून शाळेमधील गैरअर्जदार यांचे सोबत झालेल्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DHANAJI VITTHAL JALAK(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
15/5/25

HC 540

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

सहायक फौजदारी अंमलदार
पोलीस स्टेशन उमरेड

**Name** (नाव): DHANAJI VITTHAL JA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस स्टेशन उमरेड
जि. नागपूर (ग्रा.)